Estd. 1962

"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

# Revised Notification II

## जाहीर प्रकटन II

**Ref.:** 1. Advertisement No. 22, 23, 24 and 40/2024 published on University website on 10/10/2024 and various newspapers on 11/10/2024.

2. Revised notification published on 04/11/2025 on University website and various newspaper on 05/11/2025.

**संदर्भ:** १. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. १०/१०/२०२४ व विविध वृत्तपत्रामध्ये दि. ११/१०/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली जाहिरात क्र. २२, २३, २४ आणि ४०/२०२४.

२. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. ०४/१०/२०२५ व विविध वृत्तपत्रामध्ये दि. ०५/१०/२०२५ रोजी प्रसिध्द झालेले जाहीर प्रकटन.

This Revised Notification II is published with reference to the above referred advertisements and notification.

Now, the State Government of Maharashtra has revised the procedure for the recruitment of teachers in State Public Universities (Non-Agricultural) as per the Government of Maharashtra resolution Sankirn-2025/E-860421/Vishi-1, dated 11th February, 2026 which is made available below this notification.

सदरचे जाहीर प्रकटन II हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या संदर्भीय जाहिरात व जाहीर प्रकटनाच्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात येत आहे.

आता, महाराष्ट्र शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशी-१ द्वारे अधिसूचित केल्यानुसार राज्य सार्वजनिक विद्यापीठांमध्ये (अकृषि) शिक्षकांच्या भरतीसाठीच्या प्रक्रियेत सुधारणा केली आहे. सदर शासन निर्णय या जाहीर प्रकटनाखाली उपलब्ध करून देण्यात आला आहे.

1. The State Government of Maharashtra vide Government Resolution dated 11/02/2026 has cancelled the revised procedure prescribed by the Government Resolution dated 06/10/2025 and prescribed revised procedure of recruitment of teachers in State Public Universities. In this context it is hereby notified that the date to apply for the teaching posts mentioned in above advertisement has been extended as mentioned below. The interested candidates may apply through prescribed method within the said time period.

| Date of commencement to apply online | Last date to apply online | Last date of submission of hardcopies of application |
|---|---|---|
| 26th February, 2026 | 12th March, 2026 | 18th March, 2026 (up to 6.00 p.m. in the University office) |

महाराष्ट्र शासनाने दि. ११/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्य सार्वजनिक विद्यापीठांमधील शिक्षकांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी शासन निर्णय दि. ०६/१०/२०२५ अन्वये विहित केलेली सुधारणा रद्द केली असून सुधारित कार्यपद्धती विहित केली आहे. या संदर्भात या जाहीर प्रकटनाद्वारे सूचित केले जाते की, वरील जाहिरातीत नमूद केलेल्या शिक्षक पदांसाठी अर्ज करण्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे आहे. तरी, इच्छुक उमेदवार सदर कालावधीत विहित पद्धतीद्वारे अर्ज करू शकतात.

| ऑनलाईन अर्ज सुरू होण्याची तारीख | ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख | अर्जाच्या हार्डकॉपी जमा करण्याची शेवटची तारीख |
|---|---|---|
| २६ फेब्रुवारी, २०२६ | १२ मार्च, २०२६ | १८ मार्च, २०२६ (विद्यापीठ कार्यालयात सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) |

2. **The candidates who have applied already with reference to the above mentioned advertisements and Notification shall not require to apply online again.** However, as per revised guidelines regarding selection process mentioned in Government Resolution they have to submit the information in revised Standard format in single hard copy, on or before 18th March, 2026 up to 6.00 p.m. in the University office. If they have achieved additional qualifications in mean time they can also submit the relevant documents in attested form along with this Standard format. **The copy of Standard format is made available below this notification.**

   **ज्या उमेदवारांनी वर उल्लेख केलेल्या जाहीरातींना अनुसरुन या आधीच अर्ज केला आहे, त्यांनी पुन्हा ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही.** तथापि, शासन निर्णयात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार त्यांनी विहित नमुन्यातील माहिती एका प्रतीत (**हार्ड कॉपी**) दि. १८ मार्च, २०२६ पर्यंत विद्यापीठ कार्यालयात सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सादर करावी, तसेच जर त्यांनी दरम्यानच्या काळात अतिरिक्त अर्हता प्राप्त केली असेल तर त्याची संबंधित कागदपत्रे साक्षांकित करून सुधारित विहित नमुन्यासह ते सादर करू शकतात. **सुधारित विहित नमुन्याची प्रत या जाहीर प्रकटनाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

3. The candidates who have already applied online but failed to submit hard copies of application/s and necessary documents may also submit their application and documents along with the revised Standard format as mention above in six copies on or before 18th March, 2026 up to 6.00 p.m. in the University office.

   ज्या उमेदवारांनी याआधीच ऑनलाईन पध्दतीने अर्ज केला आहे, परंतु अर्जाच्या हार्डकॉपी आणि आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत, ते देखील वर नमूद केलेल्या सुधारित विहित नमुन्यासह सहा प्रतीत त्यांच्या अर्जाची छायांकीत प्रत आणि कागदपत्रे दि. १८ मार्च, २०२६ पर्यंत विद्यापीठ कार्यालयात सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सादर करू शकतात.

4. The candidates who have applied online but have submitted the hardcopies of application/s after due date as mentioned in the said advertisements and in earlier revised notification will be considered for the further process of recruitment, subject to the condition that, they submit the information in revised Standard format on or before 18th March, 2026 up to 6.00 p.m. in the University office.

   ज्या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केले आहेत. परंतु, जाहिरातीत व यापूर्वीच्या जाहीर प्रकटनात नमूद केल्याप्रमाणे विहित वेळेनंतर अर्जांच्या हार्डकॉपी सादर केल्या आहेत, त्यांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाईल. तथापि, त्यांना सुधारित विहित नमुन्यात माहिती दि. १८ मार्च, २०२६ पर्यंत विद्यापीठ कार्यालयात सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सादर करावी लागेल.

5. All other terms and conditions mentioned in said advertisements will remain same. Also, the Government Resolution issued by the State Government of Maharashtra regarding recruitment till the date of publication of this notification are applicable.

   सदर जाहिरातींमध्ये पूर्वी नमूद केलेल्या इतर सर्व अटी आणि शर्ती कायम राहतील. तसेच महाराष्ट्र शासनाने या जाहीर प्रकटनाच्या प्रसिद्ध दिनांकापर्यंत भरती संदर्भात निर्गमित केलेले शासन निर्णय लागू राहतील.

**By Order,**

(Dr. V. N. Shinde)
Registrar,
Shivaji University, Kolhapur

**Ref. No. SU/EST/PG/187**
**Date : 25/02/2026**